महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

* उत्सुकता *




RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १३ वे ■ अंक क्र. - ६० ■ बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

# भरधाव इलेक्ट्रिक बसच्या धडकेत तरुणी जागीच ठार

## मेहुणबारे येथील जामदा फाट्यावरील घटना

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव प्रतिनिधी :- भरधाव वेगाने धावणाऱ्या इलेक्ट्रिक बसने, रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या २९ वर्षीय मुलींला जोरदार धडक दिल्याने तरूणीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत प्राची महेंद्र पवार मृत झालेल्या तरुणीचे नाव आहेतअसे कळते. धुळे - चाळीसगाव महामार्गावरील मेहुणबारे जवळील जामदा फाटा येथे दि. ७ सप्टेंबर सोमवारी रोजी सकाळी सव्वा आठ वाजेच्या प्राची महेंद्र पवार रा. नवेगाव मेहुणबारे ही रस्त्याच्या कडेला उभी असताना उभी असताना धुळे हुन चाळीसगाव कडे येणाऱ्या भरधाव वेगात येणाऱ्या इलेट्रिक बसने, कडेला उभी असणाऱ्या तरुणीस जोरदार धडक देऊन चिरडले. त्यात तिचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राची मेहेंद्र पवार ही सकाळी ७.४० वाजेच्या सुमारास चाळीसगाव येथे राहणाऱ्या आपल्या काकूंना भेटण्यासाठी घरातून निघाली होती. सकाळी ८.१५ वाजेच्या सुमारास ती जामदा फाटा येथे रस्त्याच्या कडेला उभी असताना,



धुळ्याकडून चाळीसगावकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या इलेक्ट्रिक बसने (क्र. एमएच ४९ बी झेड ८२७६) तिला जोरदार धडक दिली. त्यात तिचा मृत्यू झाला. बस चालक नीलेश अशोक सोळंके रा. वलठाण, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर याने बस हयगयीने व निष्काळजीपणाने चालवून तिला चिरडले. या भीषण धडकेत प्राचीच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन प्रचंड रक्तस्त्राव झाल्याने ती जागीच बेशुद्ध पडली. अपघातानंतर स्थानिकांच्या मदतीने तिला तातडीने रुग्णवाहिकेद्वारे मेहुणबारे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी अंती तिला मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे मेहुणबारे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी मृत प्राचीचे वडील, सेवानिवृत्त शिक्षक महेंद्र नारायण पवार(ठाकरे) वय ६४वर्षे यांनी मेहुणबारे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून बसचालक नीलेश सोळंके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास मेहुणबारे पोलीस करत आहेत. दरम्यान महामार्गावर अपघात झाल्याने घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. माहिती मिळताचा मेहुणबारे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करत परिस्थिती नियंत्रणात आणली.





श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

* शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून
**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**
प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




* वैशिष्टे *
* उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
* भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
* सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
* ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
* मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
* भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
* मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९
पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
* प्राचार्य :- मोबा. 9922172799










**वाढदिवस शुभेच्छा, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

* संपर्क * ९५४५९ १०१७७

# अत्याधुनिक युगात वाढत्या गंभीर समस्या लक्षात घेता; सामाजिक दृष्ट्या साक्षर होणे गरजेचे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

१९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे. कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारत पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त ७० टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या थांबविण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे. कारण बदलत्या काळानुसार १०० टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १०० टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत.त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण, भुकमरी,वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो. भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते.यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे. जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत. आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा!असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त ३० टक्के साक्षर आहे. त्यामुळे तो गेल्या ७९ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही. पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी, खान-पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दु:ख,सुविधा,परिपक्वता,संस्कृती, आरोग्याची काळजी,अति दुर्गम भागातील विकास,सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे. त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता,भुस्खलन ,अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगलतोड व हिमालयातील विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.म्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले,जंगल संपदा मानवाने नष्ट केली,हिमालयात सुरूंग लावण्याचे काम मानवाने केले व नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वीचे संतुलन डगमगले आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे. म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी,वण्यप्राणी)त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल.चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर आता शासकीय अधिकारी प्रशासक ; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकार; निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा सहा महिन्यांपर्यंत नियुक्ती

**दै.आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद:- राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय अडचणींमुळे त्यांची निवडणूक घेता आलेली नाही, अशा ग्रामपंचायतींवर आता शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने आज मंगळवार, दि.८ सप्टेंबर रोजीनराजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध केली.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १८२ च्या पोटकलम (१) तसेच कलम १५१ मधील तरतुदींनुसार राज्य शासनाने ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकारक्षेत्रासाठी प्रत्यायोजित केले आहेत. या अधिकारानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधित ग्रामपंचायतीवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा अन्य कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करू शकतील. प्रशासकाची नियुक्ती राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपर्यंत किंवा ग्रामपंचायतीच्या स्थापनेसाठीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहणार आहे. दरम्यान, या विषयासंदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना व आदेश अधिक्रमित करण्यात आल्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुदत संपलेल्या आणि निवडणुका घेता न आलेल्या ग्रामपंचायतींच्या कारभारासाठी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तातडीने प्रशासक नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## प्रकाश पाटील यांच्या इशाऱ्याची दखल; १,५२७ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद :- तालुक्यातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध करून देण्याबाबत माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेत इशारा दिला होता. त्यांच्या पाठपुराव्याची प्रशासनाने दखल घेत अखेर तालुक्यातील पुस्तकांअभावी राहिलेल्या १,५२७ विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांची उपलब्धता करून दिली आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता १ ली ते ८ वीच्या शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. मात्र, काही वर्गांची विद्यार्थी संख्या वाढल्याने निफाड तालुक्यातील १,५२७ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके कमी पडली होती. याबाबत पालक व विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करत



पुस्तके उपलब्ध न झाल्यास तीव्र भूमिका घेण्याचा इशारा दिला होता. या प्रकरणाची दखल घेत जिल्हास्तरीय पाठ्यपुस्तक समायोजनाअंतर्गत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नाशिक यांच्या आदेशानुसार इतर तालुक्यांमध्ये शिल्लक असलेली पाठ्यपुस्तके निफाड तालुक्यास उपलब्ध करून देण्यात आली.

पंचायत समिती शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार आता सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात आला असून, सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध झाली आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पुस्तके मिळणे आवश्यक असताना निर्माण झालेल्या या समस्येकडे प्रकाश पाटील यांनी वेळीच लक्ष वेधल्याने प्रशासनाला तातडीने कार्यवाही करावी लागली. त्यामुळे प्रकाश पाटील यांच्या इशाऱ्याची प्रशासनाने दखल घेत विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून दिल्याची चर्चा तालुक्यात होत आहे.

## पोलीस भरती प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यावर भर – राज्यमंत्री योगेश कदम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. ८ : राज्यातील पोलीस भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ, सुव्यवस्थित आणि कालबद्ध करण्यासाठी वार्षिक भरती वेळापत्रक तयार करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश राज्यमंत्री (गृह) योगेश कदम यांनी दिले. उमेदवारांना भरती प्रक्रियेची निश्चित माहिती मिळून पूर्वतयारीसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध व्हावा, यासाठी भरती प्रक्रियेचे नियोजन अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

मंत्रालयात राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत २०२५-२६ मधील पोलीस भरती प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस आमदार बच्चू कडू (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) कृष्ण प्रकाश यांच्यासह गृह विभाग आणि पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. भरती प्रक्रियेच्या प्रारंभिक टप्प्यांचे वेळापत्रक निश्चित करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपाययोजना कराव्यात तसेच शासनस्तरावर आवश्यक निर्णय व मान्यता घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने भरती प्रक्रिया राबवावी, असे निर्देश कदम यांनी दिले. विविध स्पर्धा परीक्षा तसेच केंद्र शासनाच्या सुरक्षा दलांच्या भरती प्रक्रियेचे वेळापत्रक लक्षात घेऊन पोलीस भरतीतील लेखी परीक्षा व मैदानी चाचणीचे नियोजन करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. त्याचबरोबर कागदपत्र पडताळणी, वैद्यकीय तपासणी व नियुक्ती प्रक्रिया अधिक सुसूत्र करण्यासह विविध पोलीस युनिटमधील रिक्त पदांचे नियोजन आणि निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागांवर वेळेत भरती करण्याबाबतही आढावा घेण्यात आला. भरती प्रक्रियेतील तांत्रिक बाबी, ऑनलाइन अर्ज प्रणाली, निवड प्रक्रिया, पारदर्शकता, गुणवत्ता आणि प्रशासकीय कार्यक्षमता अधिक बळकट करण्यासाठी उपलब्ध पर्यायांचा अभ्यास करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश राज्यमंत्री कदम यांनी दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# धनगर समाजाचा नांदगाव तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा

## एसटी आरक्षण लागू करण्यासह विविध मागण्यांसाठी जोरदार आंदोलन

**दै.आवाज वृत्तसेवा...**
नांदगाव (प्रतिनिधी) – धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) वर्गाचे आरक्षण लागू करण्यासह विविध मागण्यांसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने नांदगाव तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. राज्यव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या मोर्चात धनगर समाजातील महिला, पुरुष तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
नांदगाव शहरातील शनी मंदिर परिसरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकापासून मोर्चाला सुरुवात झाली. घोषणाबाजी करत आंदोलक तहसील कार्यालयात पोहोचले. तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर आंदोलकांनी ठिय्या मांडून सरकारच्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त केला.आंदोलनादरम्यान धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन त्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.मागण्यांमध्ये धनगर समाजाला एसटी वर्गाचे आरक्षण लागू करणे,मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे करणे,चरवाहा समुदायाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वनराई पास उपलब्ध करून देणे,लोणावळा मिसिंग लिंक प्रकल्पाला हुतात्मा वीर शिरोबा यांचे नाव देणे, श्री संत बाळूमामा देवस्थान ट्रस्टसाठी स्वतंत्र कायदा करणे अशा मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन त्यांची पूर्तता करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.
आंदोलनादरम्यान समाजाच्या प्रतिनिधींनी सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष सुरूच ठेवले, तर येत्या काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला. आंदोलनानंतर धनगर समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार सुनील सौंदाणे यांना देण्यात आले. सरकारने धनगर समाजाच्या मागण्या तातडीने स्वीकाराव्यात, अशी मागणी आंदोलकांनी केली. तसेच मागण्या पूर्ण न झाल्यास भविष्यात अधिक व्यापक आणि उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला.

# मुंबई विभागातील नोंदणी व मुद्रांक अधिकारी–कर्मचाऱ्यांना एसएफटी व नोंदणीविषयक प्रशिक्षण

**दै.आवाज वृत्तसेवा...**
मुंबई, दि. ८ : नोंदणी व मुद्रांक विभागाच्या कामकाजात कायदेशीर अचूकता, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुखता वाढविण्यासाठी मुंबई विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहारांचे विवरणपत्र, डाटा व्हॅलीडेशन तसेच नोंदणी व मुद्रांकविषयक कायदेशीर तरतुदींवर विशेष प्रशिक्षण देण्यात आले. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, रवींद्र बिनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण नुकतेच आयोजित करण्यात आले होते.
नोंदणी उपमहानिरीक्षक, मुंबई विभाग, राजू थोटे यांच्या आयोजनातून बांद्रा येथील प्रकाशगड येथे झालेल्या या प्रशिक्षणास मुद्रांक जिल्हाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नोंदणी प्रक्रियेत कायदेशीर बाबींची अचूक अंमलबजावणी करताना नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक सेवा कशी देता येईल, याबाबत प्रशिक्षणाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. मुंबईचे अपर मुद्रांक नियंत्रक सुनील महिंद्रकर यांनी नागरिकांशी संबंधित नोंदणी प्रक्रिया कायदेशीर चौकटीत राहून अधिक सुलभ व पारदर्शक करण्यावर भर दिला.

# खोदलेल्या पाईप मोऱ्याचे काम अपूर्णच

## सुरेगाव- कोळगाव थडी मुख्यमंत्री ग्रामसडक रस्त्याची दुर्दशा

**दै.आवाज वृत्तसेवा...**
कोळपेवाडीप्रतिनिधी:–
कोपरगाव तालुक्यातील रामा ७ ते कोळपेवाडी- सुरेगाव काँक्रिटीकरण रस्ता कामांमध्ये कोळगाव थडी मार्गावर जलनिस्सारण पाईप मोर्याच्या कामासाठी एक महिन्यापासून रस्ता खोदून ठेवलेल्याने नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे दोन महिन्यानंतर सदर कामाची मुदत संपणार आहे.
आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री ग्रामसडक योजने मध्ये रा.मा.७ ते कोळपेवाडी- सुरेगाव रस्ता काँक्रिटीकरण करणे कामी सदर रस्त्याला मंजुरी मिळत एक वर्षापूर्वी अहिल्यादेवी चौकात रस्त्याचे मान्यवरांच्या हस्ते थाटामाटात उद्घाटन पार पडल्यानंतर जुलै २०२६ पासून ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाला सुरुवात करत कोळगाव थडी मार्गावर पाईप मोर्याच्या



कामांसाठी एक महिन्यापासून रस्ता खोदून ठेवल्याने नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.
पाईप मोर्याच्या एका कामासाठी आठ दिवस पुरेसे असताना एक महिना उलटून देखील अद्यापही काम अपूर्ण स्थितीत आहे. रहदारीचा रस्ता असल्याने किमान हलक्या ४ चाकी वाहनांना पर्यायी मार्ग काढून देणे टेंडर मध्ये अट असतांना ठेकेदाराने मोटरसायकल जाईल ईतकाच मिश्र उताराचा धोकादाय कच्चा मार्ग उपलब्ध करून दिला आहे यामुळे नागरिकांना कोळगाव थडी ला जाण्यासाठी कारखान्या मार्गे तीन किलोमीटर चा वळसा घालून जावे लागते. चालू वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात सदर कामाची मुदत संपत आहे.

# पिंपळगाव लेपला गणेशमुर्तींना रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात

**दै. आवाज वृत्तसेवा...**
दिपक ढोकळे , पिंपळगाव लेप : प्रतिनिधी – येथे श्रीगणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर गणपती बाप्पाच्या मूर्ती तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे.गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने येथील मूर्तिकारांच्या शेडमध्ये गणेशमूर्तींना अंतिम रूप देण्याचे काम वेगाने सुरू आहे.विविध आकारांच्या,आकर्षक व सुबक रूपातील गणेशमूर्ती तयार करण्यासाठी कारागीर दिवसरात्र मेहनत घेत आहेत.गणेशमूर्ती तयार करण्यासाठी शाडूची माती तसेच पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करण्यावर मूर्तिकारांचा भर दिला जात आहे.माती मळण्यापासून मूर्तीला आकार देणे,बारीक नक्षीकाम करणे, रंगकाम करणे,डोळे व चेहऱ्यावरील भाव उठावदार करणे तसेच अंतिम सजावट करण्यापर्यंतची सर्व कामे सध्या युद्धपातळीवर सुरू आहेत. शेडमध्ये एकाच वेळी अनेक मूर्ती तयार होत असून,गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेणाऱ्या विविध रूपातील मूर्ती पाहायला




**गणेशोत्सव जवळ आल्याने सध्या कामाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे.गणपती बाप्पाच्या मूर्ती तयार करणे ही आमच्यासाठी केवळ उपजीविका नसून आमची कला आणि श्रद्धेशी जोडलेले काम आहे.प्रत्येक मूर्ती भक्तांच्या पसंतीस उतरावी, यासाठी आम्ही बारकाईने काम करतो.यंदा पर्यावरणपूरक व शाडूच्या मातीच्या मूर्तींना चांगली मागणी असून,भक्तांच्या आवडीनुसार विविध आकार व आकर्षक रूपातील मूर्ती तयार करून रंग देत आहे**
**– श्री.विशाल रसाळ–गणेशमुर्ती कारागीर, पिंपळगाव लेप**

मिळत आहेत.पिंपळगाव लेप येथील कारागीर विशाल ज्ञानेश्वर रसाळ,विक्रम दत्तात्रय रसाळ,आविष्कार रसाळ व राहुल रसाळ यांचे गणपती बाप्पाच्या मूर्ती तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.लहान घरगुती गणेशमूर्तींपासून मोठ्या सार्वजनिक गणेश मंडळांसाठीच्या मूर्तींपर्यंत विविध आकारांच्या मूर्ती तयार केल्या जात आहेत.मूर्तींची उंची,आकर्षक आसन,मुकुट,दागिने,हातातील आयुधे आणि रंगसंगती याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

# जिल्हा रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटला राज्यमंत्री दर्जाचे मुकेशजा सारवान यांची अचानक भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**
नाशिक : सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष राज्यमंत्री सारवान यांनी भेट दिल्याप्रसंगी त्यांचे शिवसेना अधिकृत राष्ट्रीय कर्मचारी सेना सलग्न महाराष्ट्र राज्य कामगार सेनेच्या वतीने त्यांना कामगार सेनेचे महिला अध्यक्ष ज्योती लव्हेरी यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या रुग्णालयात स्वागत करण्यात आले रुग्णालयातील सफाई कर्मचारी यांच्या प्रलंबित असलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली चर्चा करत असताना उपस्थित जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश शिंपी ,डॉ संदीप सुर्यवंशी,डॉ. अनंत पवार,डॉ.अनंत गायकवाड,व्हि डी.पाटील,जाकीर शहा, शाम धिवरे, संदिप मेटकर, हे सर्व अधिकारी उपस्थित होते सफाई कर्मचाऱ्यांच्या विषयावरती चर्चा करत असताना कामगार सेनेचे अध्यक्ष रॉनी लव्हेरी यांनी आपल्या जिल्हा रुग्णालयातील वर्ग चार कर्मचारी व कामगार सेनेचे कार्यकारणी सदस्य यांच्या सोबत रुग्णालयातील वर्ग चार कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या विषयावर आक्रमक भुमिका घेवुन अधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला त्यात विशेष म्हणजे जे रुणालयातील कक्ष सेवक आहे त्यांना वारसा हक्क लागु



करा जिल्हा रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटल मधील जे पण वयस्कर कर्मचारी आहेत ज्यांचं वय ५० ते ५५ आहे किंवा खरोखर ते काही आजाराशी जडलेले आहे अशा कर्मचाऱ्यांना जिल्हा बाह्य रुग्णविभागात विभागात काम करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी रुग्णालयातील कर्मचारी कधी आजारी असले किंवा त्यांचे मुलबाळ आजारी असले यांना रुग्णालयात असलेला प्रायव्हेट रुम हा उपचारासाठी खुले करुन देण्याचा प्रश्न उपस्थित केला या अगोदर प्रायव्हेट रुम हा उपचारासाठी खुले होता पण आता प्रायव्हेट रुम हा कायमस्वरूपी बंद करण्यात आलेला तसेच जिल्हा रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटल मध्ये सफाई कर्मचाऱ्यांचे तीन ते चार वर्षापासुन प्रलंबित असलेले प्रकरण यावर तीव्र आक्रोश करत रॉनी लिव्हर यांनी नाराजी व्यक्त केली व मीटिंग चालु असताना खाली जमिनीवर बसुन अधिकारी हे न्याय देण्याचं काम करत नाही असे आयोगाचे उपाध्यक्ष यांना निदर्शनात आणुन दिले व जोपर्यंत जे सफाई कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव आपल्या प्रशासकीय कार्यालयात प्रलंबित आहे त्यावर अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत मी आहे त्याच ठिकाणी बसुन प्रशासनाचा निषेध करेल असे अधिकाऱ्यांना सांगण्यात आले शेवटी आयोगाचे उपाध्यक्ष सारवान साहेब यांनी कामगार सेनेचे अध्यक्ष रॉनी लव्हेरी यांना विनंती केल्यावर ते तेथुन उठले व आयोगाचे उपाध्यक्ष यांना रॉनी लव्हेरी यांच्या कडून असे सांगण्यात आले की साहेब तुमचा शब्द आमच्या ह्रदयात आहे असे बोलुन त्यांच्या शब्दाला मान देऊन जमिनीवरुन उठले काही वर्षापासुन सफाई कामगारांना स्वच्छतेचे काम न देता सर्व स्वच्छतेचे काम हे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडुन करण्यात येत आहे त्याप्रसंगी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांना बैठकी प्रसंगी असे सांगण्यात आले की कंत्राटी कर्मचारी हे साफसफाई करतात यांच्याशी आम्हाला काही दुमत नाही ते पण आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी उदरनिर्वाह करतात ते आमचेच भाऊबंध आहे परंतु या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आधारे आमच्या सफाई कर्मचाऱ्यांचा वारसा हक्क कुठेतरी आमच्याकडुन हीसकावुन घेण्याचा प्रयत्न प्रशासनाने करण्यात येऊ नये तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान वेतन तरी मिळावे व जिल्हा रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटल मध्ये कुठलेही मंत्री महोदय आल्यास कमीत कमी शिवसेना अधिकृत राष्ट्रीय कर्मचारी सेना संलग्न महाराष्ट्र राज्य कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांना कळविण्यात यावे असे अनेक प्रश्नावर चर्चा करण्यात आली त्याप्रसंगी सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी सर्व वर्ग चार कर्मचारी यांना असे सांगण्यात आले की आपले जे जिव्हाळ्याचे प्रश्न आहे ते पंधरा दिवसाच्या आत निकाली लावण्याचे आश्वासन दिले त्याप्रसंगी अमर करोसिया, विजय चव्हाण, सुनिल तिवडे, बाळु बुतमे, विजय शिंदे, अकबर शेख, अमर खैरालिया, लतिफ शेख, व अन्य वर्ग चार कर्मचारी व शिवसेना अधिकृत राष्ट्रीय कर्मचारी सेना संलग्न महाराष्ट्र राज्य कामगार सेनेचे सर्व कार्यकारणी सदस्य उपस्थित होते

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि सुनील गावस्कर यांच्या उपस्थितीत 'बंडखोर' चा ट्रेलर प्रदर्शित

**दै. आवाज वृत्तसेवा...**

एका स्त्रीच्या आयुष्यातला प्रत्येक निर्णय हा तिचा स्वतःचा असतोच असं नाही. कधी कुटुंब, कधी नाती, कधी समाज आणि कधी परिस्थिती तिच्यासाठी काही निर्णय घेते. पण जेव्हा तीच स्त्री 'आता पुरे!' म्हणत स्वतःच्या आयुष्याची सूत्रं आपल्या हातात घेते, तेव्हा सुरू होतो तिचा खरा बंड. अशाच सहा स्त्रियांच्या आयुष्यातील संघर्ष, त्यांचे निर्णय आणि त्यामागची कारणं उलगडणारा महेश मांजरेकर दिग्दर्शित 'बंडखोर'चा ट्रेलर नुकताच लाँच करण्यात आला. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि ज्येष्ठ क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या ट्रेलर लाँच सोहळ्याने चित्रपटाची उत्सुकता अधिकच वाढवली आहे. या सोहळ्यात महाराष्ट्रातील काही स्वतःच्या अस्तित्वासाठी बंडखोरी करणाऱ्या स्त्रियांचा सन्मानही करण्यात आला.

ट्रेलरमध्ये छाया कदम, प्रियदर्शनी इंदलकर, मृणाल कुलकर्णी, पूजा कातुर्डे, तितिक्षा तावडे आणि नित्यश्री ज्ञानलक्ष्मी साकारत असलेल्या सहाही व्यक्तिरेखांची अधिक स्पष्ट ओळख होते. या सहा जणींची आयुष्यं वेगवेगळी असली तरी त्यांच्या वाटेला आलेली परिस्थिती त्यांना एका समान बिंदूवर आणून उभी करते. आपल्यावर लादलेलं आयुष्य जगण्यापेक्षा स्वतःच्या अस्तित्वासाठी प्रश्न विचारण्याची






आणि त्याची उत्तरं शोधण्याची वेळ त्यांच्यावर येते. त्यामुळे या सहा जणींचं 'बंडखोर' होणं ही केवळ एका क्षणाची प्रतिक्रिया नसून, त्यामागे दडलेल्या अनेक भावनांची आणि अनुभवांची गोष्ट आहे.

ट्रेलरमधील संवाद, प्रसंग आणि व्यक्तिरेखांमधील नातेसंबंध या कथेला अधिक प्रभावी बनवत आहेत. सहा स्त्रिया नेमक्या कोणत्या परिस्थितीतून जात आहेत, त्यांच्या आयुष्यातील कोणत्या घटना त्यांना निर्णय घेण्यास भाग पाडतात आणि त्या निर्णयांची किंमत त्यांना काय मोजावी लागते, याची उत्सुकता ट्रेलर निर्माण करतो. विशेष म्हणजे या सहाही व्यक्तिरेखा एकमेकींपेक्षा पूर्णपणे वेगळ्या असूनही त्यांच्या संघर्षाचा सूर एकच आहे, तो म्हणजे स्वतःसाठी उभं राहाण्याचा.

ट्रेलर लाँच सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, '' 'बंडखोर'मधील या सहा स्त्रिया अनेक महिलांना नक्कीच प्रेरणा देतील. माझ्या मते, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या खऱ्या अर्थाने बंडखोर होत्या. त्यांनी ज्या परिस्थितीत समाजाचा सामना करत स्त्रियांसाठी शिक्षणाची दारं खुली केली, त्याचाच परिणाम म्हणून आज आपण इथे आहोत. त्यांचा माझ्यावर खूप मोठा प्रभाव आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरमधून समाजातील प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अनेक प्रश्न मांडलेले दिसतात. आपल्या मतांवर ठाम राहून अन्यायाविरोधात उभं राहाण्याची प्रेरणा हा चित्रपट देईल. महेश मांजरेकर यांनी नेहमीच वेगळे विषय प्रेक्षकांसमोर आणले आहेत आणि त्यांच्या चित्रपटांची आम्ही चाहते आहोत. 'बंडखोर'च्या संपूर्ण टीमचं मनापासून अभिनंदन आणि मला आवर्जून बोलवल्याबद्दल धन्यवाद.''

ज्येष्ठ क्रिकेटपटू सुनील गावस्कर म्हणाले, '' 'बंडखोर'चा ट्रेलर पाहिल्यानंतर चित्रपटाबद्दलची उत्सुकता नक्कीच वाढली आहे. माझ्या आयुष्यातील 'बंडखोर' स्त्रीबद्दल सांगायचे तर माझी आई आहे. माझ्या जडणघडणीत माझ्या आईचा मोठा वाटा आहे. माझ्या क्रिकेटच्या कारकिर्दीबाबत आणि शिक्षणाबाबत तिने नेहमीच पुढाकार घेतला. त्या काळात क्रिकेट हे फारसं सुरक्षित करिअर मानलं जात नव्हतं, परंतु माझी क्रिकेटमधली आवड ओळखून तिने मला प्रोत्साहन दिलं आणि त्याचबरोबर शिक्षणाचं महत्त्वही समजावून सांगितलं. ज्या पद्धतीने तिने मला घडवलं, त्यासाठी मी तिचा कायम ऋणी राहीन आणि मला आयुष्यात साथ देणाऱ्या माझ्या पत्नीचाही आजवरच्या वाटचालीत मोठा वाटा आहे. माझ्या आयुष्यातल्या या दोन्ही स्त्रियांमुळेच मी आज इथे आहे.''

या सोहळ्याबद्दल दिग्दर्शक महेश मांजरेकर म्हणाले, ''‘बंडखोर' हा शब्द आपण अनेकदा नकारात्मक अर्थाने वापरतो, परंतु माझ्यासाठी बंडखोर म्हणजे अन्यायाविरोधात आवाज उठवणारी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी ठामपणे उभी राहाणारी स्त्री. म्हणूनच सुनेत्रा अजित पवार यांना या चित्रपटाच्या ट्रेलर अनावरण सोहळ्यानिमित्त आवर्जून बोलावलं. त्यांच्यावर आलेल्या परिस्थितीला त्या ज्या खंबीरपणे सामोरं गेल्या आहेत. त्यातून त्यांच्यातली बंडखोर वृत्ती दिसते. माझी मोठी मुलगी खऱ्या अर्थाने बंडखोर आहे आणि तिच्यामुळेच या चित्रपटाची कल्पना सुचली. माझ्या आयुष्यात माझी आई, माझ्या पत्नी आणि मुली यांनी मला घडवलं आहे. मी आज जे काही आहे ते त्यांच्यामुळेच आहे. वेगवेगळ्या स्त्रियांच्या आयुष्यात पाहिलेल्या संघर्षातून 'बंडखोर'ची कथा आकाराला आली. हा चित्रपट मला घडवणाऱ्या आणि मला प्रेरणा देणाऱ्या प्रत्येक स्त्रीला वाहिलेली आदरांजली आहे.''

संजय शेटये, विनसन ग्राफिक प्रोडक्शन निर्मित आणि सत्यसाई फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे संवाद लेखन सिद्धार्थ साळवी आणि इरावती कर्णिक यांनी केले आहे. हा चित्रपट २४ सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

******

## प्रदीप देशमुख यांनी स्वीकारला कळवण पोलीस निरीक्षक पदाचा पदभार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक बागूल (कळवण प्रतिनिधी) : दि. ८ : कळवण पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक पदाची धुरा कार्यक्षम अधिकारी प्रदीप देशमुख यांनी स्वीकारली आहे. मागील पोलीस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या या जागेवर दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी श्री. देशमुख यांनी अधिकृतपणे पदभार हाती घेतला आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे कळवण परिसरातील कायदा व सुव्यवस्था बळकट होण्यासोबतच वाढत्या अवैध धंद्यांना आणि टवाळखोरांना लगाम बसण्याची नागरिकांमधून तीव्र अपेक्षा व्यक्त होत आहे. कळवण पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र अत्यंत विस्तृत असून त्यात जागतिक प्रसिद्ध धार्मिक स्थळ सप्तशृंगी गड, मार्कंडेश्वर डोंगर आणि मोठ्या ग्रामीण भागाचा समावेश होतो. त्यातच अपुरी पोलीस यंत्रणा आणि रिक्त पदांची समस्या कायम आहे. आई सप्तशृंगी देवीच्या यात्रा काळात तसेच व्हीआयपी आणि मंत्री महोदयांच्या दौऱ्यांच्या वेळी



**दैनिक आवाज चे प्रतिनिधी दिपक बागुल नवीन पी आय प्रदीप देशमुख यांचा कळवण नगरीत स्वागत करताना**

मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करावा लागतो. अशा व्यस्त कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणे नवीन अधिकाऱ्यापुढील मोठी कसोटी असणार आहे. मागील काही कालावधीत कळवण पोलिसांचा वचक निर्माण झाला असला, तरीही अलीकडे परिसरात पुन्हा एकदा काही अवैध व्यवसायिकांनी डोके वर काढल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे केवळ दिखाऊ कारवाई न करता कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याची गरज आहे. तसेच शाळा, कॉलेज आणि बस स्टँड परिसरात सकाळी व संध्याकाळी रोडरोमिओंचा वाढलेला त्रास, कर्णकर्कश हॉर्न वाजवणारे दुचाकीस्वार आणि विद्यार्थिनींची होणारी छेडछाड हे प्रकार रोखणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

कोणताही राजकीय दबाव न जुमानता कायद्याची कडक अंमलबजावणी करणे, गस्त वाढवणे आणि सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षेचा व विश्वासाचा माहोल निर्माण करण्याचे मोठे आव्हान प्रदीप देशमुख यांच्यासमोर आहे. या आव्हानांना ते कसे तोंड देतात आणि कळवणकरांच्या अपेक्षांवर किती खरे उतरतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.




## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत जिल्ह्यातील मंडळांनी सहभागी व्हावे - जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्सव' अंतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत नाशिक जिल्ह्यातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ११ सप्टेंबर, २०२६ पर्यंत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये पर्यावरणपूरक व पारंपरिक गणेशोत्सव साजरा करण्यास प्रोत्साहन देणे, सामाजिक उपक्रम, जनजागृती व सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना देणे, तसेच स्वच्छता, सुरक्षा, शिस्तबद्ध आयोजन आणि सामाजिक बांधिलकी यांना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गणेश मंडळांनी ११ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज व स्पर्धेसंदर्भातील सविस्तर माहिती https://ganeshotsav.pldmka.co.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जाची प्रक्रिया ऑनलाइन असून आवश्यक कागदपत्रे व माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी लागणार आहे. अर्जाची पावती ई-मेल अथवा एसएमएसद्वारे प्राप्त होणार आहे. स्पर्धेच्या निकषांमध्ये पर्यावरणपूरक व पारंपरिक गणेशोत्सव साजरा करणे, सामाजिक उपक्रम व जनजागृती तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, मंडप व देखाव्यासाठी सर्जनशीलता व सौंदर्य, स्वच्छता व सुरक्षिततेची काळजी व व्यवस्थापन, डिजिटल माध्यमांचा सर्जनशील व सकारात्मक वापर तसेच नियमांचे पालन आणि शिस्तबद्ध आयोजन या बाबींचा समावेश आहे. नाशिक जिल्ह्यातील जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.